**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मइवाधो-२०२१/प्र.क्र. २५/तां.क.४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३ जुलै, २०२१.

वाचा :- शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.विवाधो २०१७/ प्र.क्र.१८८/ उद्योग-२, दिनांक १४, फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना:-

इलेक्ट्रीक वाहनांचा वापर हा शाश्वत विकास ध्येयाच्या (Sustainable Development Goals) अंतर्गत (१) किफायतशीर आणि स्वच्छ उर्जा (Affordable and Clean Energy), (२) संसाधनाचा सुयोग्य वापर आणि निर्मिती (Responsible Consumption and Production) आणि (३) वातावरणीय बदलांना अनुरूप कृती (Climate Action) यांची उद्दीष्ट्ये साध्य करण्याकरिता एक महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्राचे इलेक्ट्रिक वाहन धोरण फेब्रुवारी २०१८ मध्ये संदर्भीय दि.१४ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले होते. या धोरणात राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा अंगीकार करणे आणि उत्पादनाचा वेग वाढविण्यासाठी वित्तीय आणि बिगर वित्तीय प्रोत्साहने जाहिर करण्यात आली होती. कालानुरूप सदर धोरणाचे सशक्तीकरण करून ते अद्यावत करण्याची गरज निर्माण झाली होती. त्यामुळे, राज्याचे इलेक्ट्रीक वाहनांचे सुधारित धोरण तयार करण्यासाठी शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्र.एमसीए २०२०/ प्र.क्र.१६७/ तां.क.२, दिनांक २२ डिसेंबर, २०२० अन्वये अपर मुख्य सचिव, परिवहन यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे (Task Force) गठन करण्यात आले होते. सदर समितीने या संदर्भातील सर्व बाबींचा अभ्यास करून, महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१, तयार केले आहे. त्यानंतर, सदर सुधारित धोरण समितीने पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास दि.१४.६.२०२१ रोजी सादर केले आहे. अपर मुख्य सचिव, परिवहन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने (Task Force) तयार केलेले "**महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१**" ची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, खाली नमूद केलेले **"महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१" या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यामध्ये राबविण्यास शासन मान्यता देत आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१ हे राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या फक्त बॅटरी व्दारे संचालित इलेक्ट्रिक वाहनांना लागू होईल. या धोरणात Mild Hybrid, Strong Hybrid, Plug-in Hybrid इलेक्ट्रिक वाहने समाविष्ट असणार नाहीत.**

## २. **"महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१"** :

### २.१ **दृष्टीक्षेप आणि अभियान** :

#### २ .१. १**दृष्टीक्षेप** (Vision):

१) शाश्वत आणि प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करणे.

२) राज्य इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरात देशात अग्रेसर बनविणे.

३) राज्याचे अग्रेसर स्थान भारतातील वाहन उत्पादनात कायम राखणे.

#### २.१.२ **अभियान** (Mission):

१) मागणी विषयक प्रोत्साहनाद्वारे राज्यात इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी आणि वापर वाढवून राज्याच्या वाहतूक परिस्थितीत अनुकूल बदल घडवून आणणे.

२) उत्पादकांसाठीच्या प्रोत्साहनाद्वारे गुंतवणूक आकर्षित करून, इलेक्ट्रिक वाहन निर्मितीचे कारखाने तसेच, ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी, इलेक्ट्रिक वाहनांचे सुटे भाग आणि त्याचे रिसायक्लींग कारखाने राज्यात स्थापित करून, उत्पादनास प्रोत्साहन देणे.

### २.२ **धोरण उद्दिष्टे** (Objectives):

१) महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ चे मुख्य उद्दिष्ट हे सन २०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांचा असेल, अशा रीतीने इलेक्ट्रिक वाहनाचा वापर वाढविणे.

२) सन २०२५ पर्यंत राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या सहा प्रदूषित शहर समूहांमध्ये किमान २५ टक्के सार्वजनिक वाहतूक वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहन प्रकारातील असावीत.

३) सन २०२५ पर्यंत राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या सहा प्रदूषित शहर समूहांमधील ताफा परिचालक (Fleet Operator), ताफा समूहक (Fleet Aggregator) आणि ग्राहक वितरण मालवाहतूक ( Last mile delivery) यांची किमान २५ टक्के वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहन प्रकारातील असावीत.

४) सन २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) बस ताफ्यातील किमान १५ टक्के वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहन प्रकारातील असावीत.

५) महाराष्ट्राला भारतातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमतेच्या बाबतीत सर्वोच्च उत्पादक राज्य करणे.

६) राज्यात ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी उत्पादनासाठी किमान एक गिगाफॅक्टरी स्थापित करणे.

७) राज्यात इलेक्ट्रिक वाहने आणि त्यांचे घटक यासाठी संशोधन आणि विकास (R&D), आणि कौशल्य विकास यांचे नियोजन करणे.

**२.३ धोरण लक्षांक (Targets):**

इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानाचा प्रसारासाठीची धोरण लक्ष्ये पुढील प्रमाणे आहेत:-

**तक्ता-१ धोरण लक्षांक**

| अ.क्र | तपशील | लक्षांक | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | सर्व वाहने<br>दोनचाकी<br>तीनचाकी<br>चारचाकी | किमान १० टक्के<br>किमान १० टक्के<br>किमान २० टक्के<br>किमान ५ टक्के | सन २०२५ पर्यंत राज्यात नवीन वाहन नोंदणीत इलेक्ट्रिक वाहनांचा अपेक्षित हिस्सा |
| (२) | ताफा परिचालक (Fleet Operator)/ ताफा समुहक (Fleet Aggregator) | सन २०२५ पर्यंत राज्यातील ताफा समुहक/ परिचालकांद्वारा परिचालित नागरी ताफ्याच्या किमान २५ टक्के इलेक्ट्रिक वाहने | नागरी क्षेत्रात परिचालन करणाऱ्या ई-कॉमर्स कंपन्या, ग्राहकवितरक/ वाहतुकदार / साधनसामग्री वाहतूकदार आणि वाहनसमुहक यांना हे लागू आहे. |
| (३) | बसेस | १. मुंबई ,अमरावती ,नागपूर ,पुणे , औरंगाबाद व नाशिक यासहा लक्षित शहर समूहांमध्ये सन २०२५ पर्यंत सार्वजनिक वाहतुकीचे २५ टक्के विद्युतीकरण साध्य करणे.<br><br>२. म.रा.मा.प.मं.च्या (MSRTC) बस ताफ्यातील १५ टक्के बस या बॅटरी इलेक्ट्रिक असाव्यात. | |
| (४) | चार्जिंगच्या पायाभूत सुविधा | **शहरे:-**<br>सन २०२५ पर्यंत सार्वजनिक आणि निम-सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्सचे शहरनिहाय लक्षांक खालील प्रमाणे आहेत:-<br><br>बृहन्मुंबई शहर समुह- १५००<br>पुणे शहर समुह- ५००<br>नागपूर शहर समुह- १५०<br>नाशिक शहर समुह- १००<br>औरंगाबाद शहर समुह- ७५<br>अमरावती- ३०<br>सोलापूर- २० | १) ३ कि.मी. X ३ कि.मी. क्षेत्रामध्ये किमान एक सार्वजनिक चार्जिंग स्टेशन, किंवा<br><br>२) प्रति दशलक्ष लोकसंख्येकरिता किमान ५० चार्जिंग स्टेशन्स, यापैकी जे जास्त असेल ते, स्थापित करणे. |

| अ.क्र | तपशील | लक्षांक | शेरा |
|---|---|---|---|
| | | **महामार्ग-**<br>सन २०२५ पर्यंत खालील चार महामार्ग / एक्सप्रेस वे हे पूर्णत: इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग सुविधांनी सज्ज करणे.<br>१) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग (मुंबई-नागपूर)<br>२) यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (मुंबई-पुणे)<br>३) मुंबई-नाशिक<br>४) नाशिक-पुणे | ३) महामार्गाच्या दोन्ही बाजुला प्रत्येकी २५ कि.मी. अंतरावर सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्स उभारणे. |
| (५) | शासकीय वाहन ताफा | दिनांक १ एप्रिल-२०२२ पासून,- शहरांतर्गत परिचालित होणारी सर्व नवीन शासकीय, निम शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थां मार्फत व शासनाच्या निधी मधून खरेदी करण्यात येणारी वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील.<br><br>तसेच, शासकीय वापरासाठीची भाडेतत्वावरील सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक असतील. | |

**टिप:**

१) तीन चाकी आणि चार चाकी लक्षांकात प्रवासी तसेच माल वाहतूक वाहनांचा समावेश आहे.

२) ई-कॉमर्स कंपन्यांमध्ये ॲमेझॉन, फ्लिपकार्ट इत्यादी कंपन्यांचा समावेश आहे. ग्राहक माल वितरक वाहतुकदारांमध्ये उदा. झोमॅटो, स्विग्गी आणि इतर कुरियर आणि मालवाहतुकदार कंपन्या आणि वाहतुक समुहकांमध्ये उदा. ओला, उबेर, काळी पिवळी टॅक्सी इत्यादींचा समावेश आहे.

## २.४ इलेक्ट्रिक वाहन व तदनुषंगिक इतर प्रोत्साहने:

### २.४.१ मागणी विषयक प्रोत्साहने:

**परिवहन विभाग :**

१) या धोरणांतर्गत खालील सर्व प्रोत्साहने (अ), (ब), (क), (ड) व (इ) वितरणाची प्रक्रिया नमूद करणारी परिचालनीय मार्गदर्शक तत्वे (Operational Guidelines for availing demand incentive)

सदर शासन निर्णयाच्या दिनांका पासून १५ दिवसांत परिवहन विभागाकडून निर्गमित केली जातील.

२) राज्य प्रोत्साहने ही केंद्र सरकारने देऊ केलेल्या FAME २ (Faster Adoption and Manufacturing of Electric Vehicles - Phase II) प्रोत्साहनांव्यतिरिक्त (in addition to) असतील. ही प्रोत्साहने वाहन उत्पादकांना (AUTO OEM) अनुज्ञेय राहतील. भारत सरकारच्या FAME-२ या योजनेखाली मंजुर असलेली वाहन मॉडेल्स या प्रोत्साहनासाठी पात्र असतील. FAME-२ योजनेमध्ये भारत सरकारने बदल केल्यास तो बदल या योजनेसही लागू होईल.

३) सदर प्रोत्साहने वाहन खरेदीदारांना खरेदी दरम्यान उपलब्ध असतील आणि ती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी वाहन उत्पादकांची असेल.

४) वाहन उत्पादकांना प्रोत्साहनांचे वेळेवर आणि पारदर्शक हस्तांतरण करण्यासाठी प्रोत्साहन संवितरण पद्धत (मागणी प्रोत्साहने, वाहन मोडीत काढण्यासाठीची प्रोत्साहने, चार्जिंग पायाभूत सुविधा प्रोत्साहने, पुरवठाविषयक प्रोत्साहने, करमाफी, प्रतिपूर्ती इत्यादी) ही एका ऑनलाईन पोर्टल (online portal) द्वारे केली जाईल.

५) ई-कॉमर्स कंपन्या, ग्राहक वितरक / वाहतूकदार आणि वाहतूकसमुहक यांनी सदर शासन निर्णयाच्या दिनांका पासून सहा महिन्यांत परिवहन विभागाकडे इलेक्ट्रिक वाहन संक्रमण कृती आराखडा (EV transition action plan) सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) मुलभूत मागणी प्रोत्साहने (Basic Demand Incentives) :**

मुलभूत मागणी प्रोत्साहने ही वाहन बॅटरी क्षमतेनुसार **तक्ता-२** प्रमाणे राहतील

**तक्ता-२ इलेक्ट्रिक वाहनांसाठी मागणी प्रोत्साहने**

| अ. क्र. | वाहन प्रकार | उपलब्ध प्रोत्साहने (रु./kWh) | प्रोत्साहने मिळू शकणाऱ्या वाहनांची संख्या | प्रति वाहन महत्तम प्रोत्साहन (रुपये) |
|---|---|---|---|---|
| (१) | ई- दोन चाकी (एल १ व एल २) | ५००० | १,००,००० | १०,००० |
| (२) | ई-तीनचाकी ऑटो (एल ५ एम) | ५००० | १५,००० | ३०,००० |
| (३) | ई-तीनचाकी माल वाहतूक वाहन (एल ५ एन) | ५००० | १०,००० | ३०,००० |
| (४) | ई-चारचाकी कार (एम १) | ५००० | १०,००० | १,५०,००० |
| (५) | ई-चाकी माल वाहतूक वाहन(एन १) | ५००० | १०,००० | १,००,००० |
| (६) | ई-बसेस* | वाहन किंमतीच्या १० टक्के** | १,००० | २०,००,००० |

**टिप:**

** सदर प्रोत्साहन फक्त एसटीयु (State Transport Undertaking) बसेसनाच उपलब्ध असेल.*

*** एक्स-फॅक्टरी किंमत*

१) बॅटरीसह विक्री केलेल्या इलेक्ट्रिक वाहनांना संपूर्ण (१००%) मूलभूत प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

२) बॅटरीशिवाय विकलेल्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी, मूलभूत प्रोत्साहनाच्या ५० टक्के रक्कम ही वाहन उत्पादकाला दिली जाईल. जी वाहन खरेदीदाराला हस्तांतरीत करणे अनिवार्य असेल. उर्वरित मूलभूत प्रोत्साहनपर रक्कम (५०टक्के पर्यंत) ही वाहन खरेदीदाराने बॅटरी संदर्भात करार केलेल्या मान्यताप्राप्त ऊर्जा परिचालकाला (Battery Swapping Company/ Operator) दिली जाईल.

**(ब) त्वरित नोंदणी सूट** (Early Bird Incentives) **:**

१) दिनांक ३१ डिसेंबर २०२१ च्या आधी इलेक्ट्रिक वाहन (ई-बसेस व्यतिरिक्त) नोंदणी करणारे खरेदीदार हे वाहन बॅटरी क्षमतेनुसार अतिरिक्त रु. ५०००/ kWh "**त्वरित नोंदणी**" (Early Bird) सूट मिळण्यास पात्र असतील. ही सूट **तक्ता-२** मध्ये नमूद केलेल्या मागणी प्रोत्साहनाच्या व्यतिरिक्त दिली जाईल. महत्तम त्वरित नोंदणी सूट ही रु. १,००,००० प्रति वाहन इतकी मर्यादित असेल.

**(क) वाहन मोडीत काढण्यासाठीचे प्रोत्साहने** ( Vehicle Scrappage incentive ) **:**

१) वर्गनिहाय वाहन मोडीत काढण्यासाठीची प्रोत्साहने (Scrappage Incentive) **तक्ता-३** मध्ये वर्णन केली आहेत. वाहन मोडीत काढण्यासाठीच्या प्रोत्साहनाची प्रतिपूर्ती राज्य शासन करेल. त्यासाठी खालील बाबी आवश्यक आहेत:

- विक्रेता किंवा उत्पादक यांच्याकडून जुन्या वाहनाच्या मोडीसाठी (Scrappage) सुसंगत योगदान (equal monetary contribution from dealer or OEM) केल्याचा पुरावा
- त्याच वाहन प्रकारातील जीवाश्म इंधन वाहन मोडीत काढल्याबाबतची पुष्टी

**तक्ता-३ वर्गनिहाय निहाय वाहन मोडीत काढण्यासाठीची प्रोत्साहने**

| **अ.क्र.** | **वाहन प्रकार** | **वाहन मोडीत काढण्यासाठी असलेले प्रोत्साहन** |
|---|---|---|
| (१) | ई- दोन चाकी (एल १ व एल २) | रु.७,००० पर्यंत |
| (२) | ई-तीन चाकी (एल ५ एम व एल ५ एन) | रु.१५,००० पर्यंत |
| (३) | ई-चार चाकी (एम १ व एन १) | रु.२५,००० पर्यंत |

**(ड) बॅटरी हमी आणि आश्वासित बायबॅक करारावर प्रोत्साहने** ( Battery warrantee & assured buyback incentives):

१) बॅटरी आर्युमान तसेच वाहन पुनर्विक्री (Buyback) मुल्य याबाबत असलेली साशंकता, यामुळे ग्राहकांना वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळवण्यात अडचणी येतात. बॅटरी इलेक्ट्रिक दोन चाकी आणि तीन चाकी ग्राहकांना / तसेच इतरांना असलेली ही साशंकता दूर करण्यासाठी, महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१ हे इलेक्ट्रिक वाहन उत्पादकांना **तक्ता-४** नुसार अतिरिक्त प्रोत्साहने (जी ग्राहकांना हस्तांतरित करायची आहेत) देईल.

२) वाहन उत्पादक इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीसाठी किमान पाच वर्षाची हमी देतील. त्यांना, **तक्ता-४** नुसार अतिरिक्त प्रोत्साहने पात्र असतील.

३) वाहन उत्पादक त्यांच्या खरेदीदारांना आश्वासीत पुनर्खरेदी (Buyback) ची हमी देतील. त्यांना, **तक्ता-४** नुसार अतिरिक्त प्रोत्साहने पात्र ठरतील.

४) इलेक्ट्रिक वाहन उत्पादक ही दोन्ही प्रोत्साहने एकाच वेळी घेऊ शकतील. मात्र, एकूण प्रोत्साहन रक्कम रु. १२,००० प्रति वाहन पर्यंत मर्यादित असेल. ही रक्कम **तक्ता-२** मध्ये नमूद केलेल्या प्रोत्साहनाव्यतिरिक्त असेल आणि वरील सर्व प्रोत्साहने विचारात घेतल्यानंतर निव्वळ मुल्यावर आधारित असेल.

**तक्ता-४ आश्वासित बायबॅक आणि बॅटरी हमी प्रोत्साहने**

| अ.क्र. | प्रोत्साहनांचे वर्णन | प्रोत्साहने |
|---|---|---|
| (१) | आश्वासीत पुनर्खरेदी (Buyback) (up to ५ years with a depreciation rate not more than ७.५%) | वाहनाच्या एकूण किंमतीच्या ६ टक्के (रुपये १०,००० ची मर्यादा) |
| (२) | किमान पाच वर्षांची बॅटरी हमी | वाहनाच्या एकूण किंमतीच्या ४ टक्के (रुपये ६,००० ची मर्यादा) |

**(इ) इतर मागणी विषयक प्रोत्साहने** ( Other Demand Incentives):

१) राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या सर्व बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांना सदर धोरणाचा कालावधी संपेपर्यंत मोटर वाहन करातून माफी दिली जाईल. या संदर्भातील तपशीलवार आदेश परिवहन विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील.

२) रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या दिनांक १८ जून २०१९ च्या अधिसूचनेनुसार राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या सर्व इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी प्रमाणपत्र जारी होण्यासाठी किंवा नूतनीकरणासाठी / नवीकरणासाठी शुल्काच्या प्रदानातून सूट दिली जात आहे.

३) वैयक्तिक खरेदीदार हा संबंधित वाहन प्रकाराकरिता फक्त एकदा प्रोत्साहन घेऊ शकतो. ताफा समुहक / परिचालक त्यांच्या मालकीच्या ताफ्याकरिता प्रतिवाहन प्रोत्साहने घेऊ शकतात. यासाठी परिचालनीय मार्गदर्शक तत्वांमध्ये त्याची तपशीलवार माहिती देण्यात येईल.

४) राज्य शासन हे ई-ऑटो, माल वाहतूक वाहने आणि टॅक्सी यासारख्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन ग्राहक विभागांसाठी खास व्याज दर देऊ करण्यासाठी वित्तीय संस्था आणि बँका यांना वचनबध्द आणि प्रोत्साहित करेल.

५) वाहनसमुहक, ग्राहक मालवितरण वाहतुकदार, साधन सामग्री वाहतूकदार यांच्या मालकीच्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन ताफ्याची वेगवान व समयबध्द (Fast and timebound) नोंदणी सुनिश्चित केली जाईल.

६) राज्यातील कोणत्याही वाहन प्रकारातील बॅटरी इलेक्ट्रिक वाहनाची नोंदणी ही हिरवी नंबर प्लेटनेच (Green number plate) केली जाईल.

७) रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक १८ ऑक्टोबर २०१८ च्या अधिसूचनेनुसार ई-ऑटोसाठी परवाना आवश्यक नसेल आणि अधिसूचनेतील तरतूदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

८) ऑटो रिक्षांबद्दल असलेली शहर विनिर्दिष्ट बंधने (City Specific Restrictions) ही स्थानिक वाहतूक परिस्थितीनुसार ई-ऑटो रिक्षांनासुध्दा लागू राहातील.

२.४.२ **पायाभूत चार्जिंग व्यवस्था निर्मितीसाठीची प्रोत्साहने** (Charging Infrastructure Development Incentives) **:**

**(१) उर्जा विभाग :**

१) सार्वजनिक आणि निम-सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्स (Public Charging Stations (PCS) व Semi- Public Charging Stations (SPCS)) खालील **तक्ता-५** मध्ये नमूद केल्यानुसार, सदर धोरणा अंतर्गत पायाभूत चार्जिंग व्यवस्था निर्मितीसाठीच्या प्रोत्साहनाकरिता पात्र असतील.

**तक्ता-५ चार्जिंग पायाभूत सुविधांसाठी प्रोत्साहने**

| अ.क्र. | PCS/SPCS चा प्रकार | प्रोत्साहन रक्कम | प्रति PCS/SPCS साठी उपलब्ध महत्तम प्रोत्साहन | प्रोत्साहन मिळू शकणा-या PCS/SPCS ची महत्तम संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | मंदगती | खर्चाच्या ६० टक्के* | रु.१०,००० | १५,००० |
| (२) | मध्यम/वेगवान गती | खर्चाच्या ५० टक्के* | रु.५ लाख | ५०० |

** फक्त चार्जिंग स्टेशनचा खर्च (यात जमीन खर्च आणि चार्जिंग स्टेशन स्थापित करण्यासाठीचा इतर सहायभूत खर्च समाविष्ट नाही)*

२) सदर चार्जिंग स्टेशन्स ही त्या स्टेशनच्या परिचालनाला प्रारंभ (Start of Operation) झाल्यानंतरच प्रोत्साहनासाठी पात्र असतील. परिचालनीय मार्गदर्शक तत्वे (Operational Guidelines for Charging Infrastructure Incentives) ही प्रोत्साहने मिळण्यासाठी असलेले पात्रता निकष स्पष्ट करतील आणि सदर शासन निर्णयाच्या दिनांका पासून १५ दिवसांत उर्जा विभागाकडून निर्गमित केली जातील. परंतु, FAME २ चार्जिंग पायाभूत सुविधा प्रोत्साहनाचा लाभ

घेणारी सार्वजनिक आणि निम-सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्स उपरोक्त प्रोत्साहनासाठी पात्र नसतील.

३) उर्जा विभागामार्फत राज्य समन्वयक संस्था ( Nodal Agency) ची स्थापन केली जाईल आणि इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा उभारणीसाठी एकात्मिक चार्जिंग सुविधा योजना (Integrated Charging Infra. Plan) विकसित करून राबवली जाईल.

४) चार्जिंग पायाभूत सुविधा सेवा पुरवठादारांना त्यांच्या व्यवसाय योजनांनुसार राज्यात चार्जिंग स्टेशन्स स्थापन करण्यास परवानगी दिली जाईल. सेवा पुरवठादारांनी विकसित केलेल्या चार्जिंग स्टेशन्सना राज्य समन्वक संस्थेने (Nodal Agency) तयार केलेल्या राज्यस्तरीय चार्जिंग पायाभूत सुविधा योजनेत (Integrated State Charging Infra. Plan) भविष्यात विलीन केले जाईल.

५) उर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी स्पष्ट केल्यानुसार इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग ही सेवा आहे. राज्यात जिथे कोणतेही चार्जिंग स्टेशन हे शासकिय (केंद्र किंवा राज्य) प्रोत्साहनासह (वित्तीय किंवा अन्य) स्थापित केले असेल, अशा प्रकरणांमध्ये राज्य समन्वयक संस्था (नोडल एजन्सी) / राज्य सरकार / समुचित आयोग यांनी अधिसूचित सेवा आकारांशी संबंधित कोणतेही केलेले विनियम, सेवा पुरवठादारांनी पाळणे आवश्यक असेल.

६) राज्यातील सर्व इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन्स आणि बॅटरी हस्तांतरण स्टेशन्ससाठी (Battery Swapping Stations) लागू असलेला वीज दर हा महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (MERC) निर्गमित केलेल्या दिनांक ३० मार्च, २०२० रोजीच्या आदेश क्रमांक ३२२/२०१९ नुसार किंवा भविष्यातील MERC आदेशानुसार लागू राहतील.

७) सार्वजनिक कार्यक्षेत्रात उपलब्ध सर्व सार्वजनिक चार्जिंग प्रणालींची माहिती आणि त्या प्रणालीचा प्रत्यक्ष वापर, यासाठी एक केंद्रीयकृत इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन व्यवस्थापन प्रणाली (पोर्टल) (Centralized EV Charging Station Management Portal) आणि रोखरहित प्रदान (Cashless Transaction) पर्यायासह युझर ॲप्लिकेशन (ॲंड्रॉईड, आयओएस आणि/ किंवा इतर) उपलब्ध करुन देण्यासाठी चार्जिंग सेवा पुरवठादारांना उत्तेजन दिले जाईल. यामध्ये उर्जा विभाग / राज्य समन्वयक समिती यांनी पुढाकार घ्यावा.

**(२) नगर विकास विभाग व इतर विभाग :**

१) स्थानिक स्वराज्य संस्था निवासी मालमत्ता धारकांना मालमत्ता करामध्ये विशिष्ट सूट देऊन, खाजगी इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा स्थापना करण्यासाठी उद्युक्त करतील. या संदर्भात सविस्तर नियमावली उर्जा विभागाच्या / राज्य समन्वयक संस्थेच्या मार्गदर्शनाखाली नगर विकास विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

२) महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०२५ पर्यंत होणाऱ्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन प्रसारासाठी पूरक पायाभूत इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधे संदर्भात शहरपातळीवर योजना तयार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१ अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग स्टेशन्सना -सुविधा॰ (Amenity) म्हणून घोषीत करण्यात येत आहे. त्यानुसार, सवलतीच्या भाडेदरात चार्जिंग पायाभूत सुविधा स्थापन करण्यासाठी (Installation) उपलब्ध केले जाऊ शकणारे आणि विविध शासकिय / जमीन मालक / एजन्सी यांच्याकडे उपलब्ध असलेले भूखंड ( सध्या अस्तित्वात असलेल्या इंधन स्टेशनसह) आणि चार्जिंग स्टेशन्स ठिकाणे नगर विकास विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांनी निश्चित करणे अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहर विकास आराखड्यामध्ये (City Development Plan) इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन्ससाठी जागा राखून ठेवणे आवश्यक आहे. या संदर्भात नगर विकास विभाग व उर्जा विभाग यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून शहर पातळीवर त्याची अंमलबजावणी करून घ्यावी.

३) गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार (MoHUA, Govt.of India) यांनी खाजगी आणि व्यावसायिक इमारतींमध्ये इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची तरतूद करण्यासाठी इमारत संहिता (Building code) आणि शहर विकास आराखडा (City Development Plan) नियमांमध्ये सन २०१९ मध्ये सुधारणा निर्गमित केल्या आहेत. या सुधारणा योग्य पद्धतीने लागू करणे आवश्यक आहे आणि त्या नवीन इमारतींना लागू होतील. या संदर्भात नगर विकास विभाग यथोचित कार्यवाही करेल.

४) पंधराव्या वित्त आयोगाने (१५$^{th}$ Finance Commission (FCC)) राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत (National Clean Air Program) हवेचा दर्जा सुधारण्यासाठी शहर कृती योजनांनुसार उपाय करण्यासाठी, सन २०२०-२१ करिता महाराष्ट्रातील बृहन्मुंबई शहरी समुह, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि वसई-विरार या सहा शहरांना अनुदानाचे वाटप केले आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा अंगीकार हा हवेचा दर्जा सुधारण्यासाठी शहरांना सहायक होऊ शकतो, हे लक्षात घेऊन चार्जिंग पायाभूत सुविधा स्थापित करण्यासाठी व वीज वितरण कंपन्यांना पायाभूत सुविधांची वाढ करण्याकरिता, NCAP शहरांमध्ये या FCC अनुदानातून निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या संदर्भात नगर विकास विभाग व उर्जा विभाग यथोचित कार्यवाही करेल.

५) या आधी नमूद केलेले लक्षीत सहा शहर समूह, या शहरांच्या स्थानिक स्वराज्य संस्था यांनी निश्चित आणि अधिसूचित केल्यानुसार कमी उत्सर्जन परिमंडळे (Low Emission Zone) निर्माण करतील. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था योजना बनवून त्याची अंमलबजावणी करतील.

६) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना, स्थानिक वाहतूक स्थितीच्या अधीन राहून इलेक्ट्रिक वाहनांसाठी लेन आणि पार्किंग प्राधान्य पुरविण्याकरिता उत्तेजन दिले जाईल. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करतील.

७) नवीन निवासी इमारतींना त्यांच्या एकूण पार्किंग जागांपैकी किमान २० टक्के जागा इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज स्वरुपात ठेवणे बंधनकारक असेल, ज्यापैकी ३० टक्के ही सामाईक पार्किंग जागा किंवा कोणा व्यक्तिगत निवासी सदनिका मालकाला वाटप न केलेली पार्किंग जागा असावी. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था योजना बनवून त्याची अंमलबजावणी करतील.

८) नवीन निवासी प्रकल्प विकासकांना, सन २०२२ पासून इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज पार्किंग खरेदी पर्याय देणे आवश्यक असेल. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था योजना बनवून त्याची अंमलबजावणी करतील.

९) सार्वजनिक पार्किंग प्लाझा त्यांच्या एकूण क्षमतेच्या किमान २५ टक्के जागा, सन २०२३ पर्यंत इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज जागांमध्ये रूपांतरित करतील. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करतील.

१०) सर्व संस्थात्मक आणि व्यावसायिक संकुले सन २०२३ पर्यंत, त्यांच्या एकूण पार्किंग जागांपैकी किमान २५ टक्के जागा इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज जागांमध्ये रूपांतरित करतील. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करतील.

११) सर्व शासकिय कार्यालये सन २०२५ च्या आधी, त्यांच्या एकूण पार्किंग जागांपैकी १०० टक्के इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधेसाठी सुसज्ज पार्किंगमध्ये रूपांतरित करतील.

१२) लिलाव / बोली प्रक्रियेतील वाटप करण्यात आलेल्या सर्व भविष्यकालीन सार्वजनिक पार्किंग जागा सर्व इलेक्ट्रिक वाहनांना मोफत पार्किंग पुरवतील. या संदर्भात नगर विकास विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करतील.

१३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग / इतर संबंधित विभाग यांनी मुख्य राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर चार्जिंग पायाभूत सुविधा स्थापन करण्याकरिता ठिकाणे निश्चित करणे आवश्यक आहे.

### २.४.३ उत्पादक क्षेत्रविषयक प्रोत्साहने:

**(१) उद्योग विभाग**

राज्यात इलेक्ट्रिक वाहन उत्पादन आणि संशोधन व विकास अनुषंगिक इतर घटक व्यवस्था विकसित करण्यासाठी गुंतवणूक आकर्षित करण्याचे महाराष्ट्र शासनाने ध्येय बाळगले आहे.

१) राज्यात इलेक्ट्रिक वाहन संबंधित उत्पादन आणि संशोधन व विकास केंद्रे (सुटे भाग उत्पादन, वाहन जुळणी, बॅटरी जुळणी, बॅटरी सेल उत्पादन, इलेक्ट्रॉनिक भाग उत्पादन, इलेक्ट्रिक वाहन

आणि इलेक्ट्रिक वाहन बॅटरींचा पुनर्वापर इत्यादी) स्थापित करण्यासाठी उत्पादकांना प्रोत्साहने दिली जातील. राज्यात उत्पादन प्रकल्पाचे ठिकाण याचा विचार न करता विशाल प्रकल्पांच्या D+ प्रवर्गाखालील / इतर प्रवर्गाखालील सर्व फायदे या उद्योगांना दिले जातील. ही प्रोत्साहने सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होतील आणि राज्य शासनाच्या उद्योग विभागाद्वारे वितरित (Distribute) केली जातील. या संदर्भातील परिचालनीय मार्गदर्शक तत्वे (Operational guidelines for supply side incentives ) १५ दिवसामध्ये उद्योग विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

२) भारत सरकारने ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी उत्पादनाकरिता उत्पादन निगडित प्रोत्साहन (PLI) योजना दिनांक १२ मे, २०२१ रोजी प्रस्तावित केली आहे. या धोरणाखाली सन २०२३ पर्यंत ॲडव्हान्स केमिस्ट्री सेलच्या उत्पादनासाठी किमान एक गिगाफॅक्टरी (Gigafactory) आकर्षित करणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे. भारत सरकारच्या PLI योजनेखाली देऊ करण्यात आलेल्या प्रोत्साहन रकमेत लक्षणीय वाढ होईल / त्यास सुसंगत होईल, अशा रीतीने स्पर्धात्मक प्रोत्साहने देण्यासाठी शासन प्रयत्न करेल.

३) पर्यावरण अनुकूल वाहन मोडीत काढण्याकरिता (इलेक्ट्रिक वाहनांसहित), एक परिपूर्ण व्यवस्था निर्माण करण्याचे राज्याचे ध्येय आहे आणि वाहन मोडीत काढण्या संदर्भातील धोरण तयार करण्याची योजना आखत आहे, जी राज्याच्या **परिवहन विभागामार्फत** (Transport Dept.) योग्य वेळी अधिसूचित केली जाईल. तसेच, इलेक्ट्रिक वाहन बॅटरी आणि त्यांचे घटक यांची सुरक्षित हाताळणी आणि त्यांची विल्हेवाट यासाठीसुध्दा मार्गदर्शक तत्त्वे अधिसूचित करण्यात येतील.

**२.५ नवतंत्रज्ञान प्रशिक्षण व रोजगार निर्मिती:**

१) शासन संबंधित / इच्छुक वाहन उत्पादक, सेवा प्रदाताच्या भागीदारीत इलेक्ट्रिक वाहना विषयी आणि शैक्षणिक संस्था यांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे आरेखन (Syllabus Development) व विविध औद्योगिक संस्थांमधून कुशल मनुष्यबळाची निर्मिती केली जाईल.

२) या संदर्भात उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभाग विविध संबंधित घटकांशी विस्तृत चर्चा करून पुढील योजना बनवेल.

३) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी अंतर्गत (Maharashtra State Innovation Society) इलेक्ट्रिक वाहन नव उद्योजकांना (Startups) उत्तेजन दिले जाईल.

**२.६ शासकीय वाहने :**

१) दिनांक १ एप्रिल,२०२२ पासून, शहरांतर्गत परिचालित होणारी, सर्व शासकीय, निम शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थां मार्फत व शासनाच्या निधी मधून खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील. तसेच, शासकीय वापरासाठी भाडेतत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही

बॅटरी इलेक्ट्रिक असतील. त्यानुसार, शासकीय वाहन खरेदी धोरणा मध्ये आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात यावी.

२.७ **शुन्य उत्सर्जन वाहन** (Zero Emission Vehicles (ZEV)**:क्रेडीट कार्यक्रम (**

१) राज्याकरिता ZEV कार्यक्रमाची आवश्यकता आणि त्यासंबंधीचा तपशील याची आखणी व अंमलबजावणी **परिवहन विभागामार्फत** निर्गमित करण्यात येईल.

२.८ **जनजागृती मोहीम:**

१) इलेक्ट्रिक वाहने व त्यांचे फायदे आणि त्यासाठी राज्य व केंद्र शासनाचे धोरणांतर्गत उपलब्ध असलेली प्रोत्साहने याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यासाठी वाहन उत्पादक आणि विविध सामाजिक संस्थांच्या भागीदारीतून राज्य शासना मार्फत एक जनजागृती कार्यक्रम तयार करून त्याचा प्रचार व प्रसार करण्यात येईल.

३. **अंमलबजावणी व संनियंत्रण यंत्रणा** :

३.१ महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण ,२०२१ च्या अंमलबजावणीचे संनियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी पुढील प्रमाणे **"सुकाणू समिती "(Steering Committee)** गठित करण्यात येत आहे:

| | | |
|---|---|---|
| (१) | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| (२) | अतिरिक्त मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| (३) | प्रधान सचिव, (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| (४) | प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| (५) | प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| (६) | प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |
| (७) | शासनाने नामनिर्देशित केलेले उद्योग प्रतिनिधी आणि / किंवा तज्ञ | सदस्य |

३.१.१ सदर सुकाणू समिती महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१ च्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी उपाय करेल. तसेच, आवश्यकतेनुसार धोरणात सुधारणा करेल. तसेच, भविष्यात नव्याने उदयाला येणाऱ्या तंत्रज्ञानांना (उदाहरणार्थ फ्युएल सेल वाहने इत्यादी) प्रोत्साहन देण्याचाही विचार करेल.

३.२ सुकाणू समिती आवश्यकतेनुसार प्राधान्य क्षेत्रांसाठी उप-समिती किंवा विशेष टास्क फोर्स निर्माण करेल.

३.३ सुकाणू समितीला सहाय्य करण्यासाठी परिवहन विभागांतर्गत **"महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन उपविभाग"** निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे. या उपविभागासाठी आवश्यक पदे परिवहन विभागा मधून तसेच पर्यावरण व वातावरणीय विभागा मधून उपलब्ध करून देण्यात येतील.

त्याचप्रमाणे या उप विभागात तज्ञ व व्यावसायिकांचा समावेश करण्यात येईल. या उपविभागासाठी कोणत्याही प्रकरची नवीन पदे निर्माण करण्यात येणार नाहीत. हा उपविभाग इलेक्ट्रिक वाहन धोरणांच्या दैनंदिन परिचालनासाठी जबाबदार असेल.

३.४ महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१ चे सर्वंकश संनियंत्रण व समन्वय पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत करण्यात येईल. यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामध्ये **-संनियंत्रण व समन्वय कक्ष॰** गठीत करण्यात येईल.

३.५ महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१ मधील विविध प्रोत्साहने व अंमलबजावणीची विभाग निहाय जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | प्रोत्साहने | संबंधित प्रशासकीय विभाग |
|---|---|---|
| (१) | मागणी विषयक प्रोत्साहने | जोपर्यंत संबंधित लेखाशिर्ष परिवहन विभागाकडे हस्तांतरीत होत नाही तोपर्यंत सदर प्रोत्साहने **उद्योग विभागा** मार्फत वितरीत केली जातील .<br>लेखाशिर्ष हस्तांतरीत झाल्यानंतर **परिवहन विभागा** मार्फत वितरीत करण्यात येतील. |
| (२) | पायाभूत चार्जिंग व्यवस्था निर्मित्तीसाठीची प्रोत्साहने | **ऊर्जा विभाग** |
| (३) | उत्पादन क्षेत्राविषयक प्रोत्साहने | **उद्योग विभाग** |
| (४) | नवतंत्रज्ञान प्रशिक्षण व रोजगार निर्मित्ती | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच कौशल्य विकास व उद्योजगता विभाग** |

४. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१ च्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारा निधी हा जुन्या वाहनांच्या नोंदणीसाठी आकारण्यात येत असलेला हरित कर, जीवाश्म इंधनावरील उपकर इत्यादी सारख्या वेगवेगळ्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

५. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१ ची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील ४ वर्षात येणाऱ्या रूपये ९३० कोटीच्या खर्चास शासन मान्यता देत आहे. या धोरणांतर्गत मागणी विषयक प्रोत्साहने परिवहन विभागा मार्फत, पायाभूत चार्जिंग व्यवस्था निर्मित्तीसाठीची प्रोत्साहने उर्जा विभागा मार्फत, उत्पादन क्षेत्र विषयक प्रोत्साहने उद्योग विभागा मार्फत वितरीत करण्यात येतील. उपरोक्त परिच्छेद क्रमांक २.४.१, २.४.२ आणि २.४.३ मध्ये परिभाषीत केलेल्या प्रोत्साहनांसाठी या विभागांना उपलब्ध होणारी वित्तीय तरतूद ही महत्तम प्रोत्साहन रक्कम (Amount) आणि महत्तम वाहन संख्या / चार्जिंग सुविधा संख्या यांच्याशी अधारित असेल.

६. सदर शासन निर्णय, परिवहन विभाग, उद्योग विभाग, उर्जा विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक १७८१/ सचिव (व्यय), दिनांक २८ जून, २०२१ अनुसार व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०७२३१४१३५८७५०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( मनीषा पाटणकर-म्हैसकर )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा. मंत्री उद्योग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. मंत्री, परिवहन, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. मंत्री, उर्जा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मा. मंत्री, कौशल्य व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
९. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२ (उर्वरित सर्व)
१०. मा. राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
११. मा. राज्यमंत्री, उद्योग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. मा. राज्यमंत्री, उर्जा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. मा. राज्यमंत्री, परिवहन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. मा. राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२ (उर्वरित सर्व)
१५. मा. सभापती, विधान परिषद, यांचे सचिव विधान भवन, मुंबई
१६. मा. अध्यक्ष, विधान सभा, यांचे सचिव विधान भवन, मुंबई
१७. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
१८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
१९. सर्व विधान मंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई
२०. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२१. अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२. अपर मुख्य सचिव, (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२४. प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२६. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२७. सचिव, वित्त (व्यव) विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२८. सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२९. महालेखापाल महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
३०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३१. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
३२. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
३३. सर्व विभागीय आयुक्त
३४. सर्व जिल्हाधिकारी
३५. सर्व महानगरपालिका आयुक्त
३६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
३७. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३८. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका व नगर पंचायत
३९. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
४०. सर्व ग्राम विकास अधिकारी / ग्राम सेवक , ग्राम पंचायत
४१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय (प्रसिध्दीसाठी)
४२. संचालक, मुंबई दूरदर्शन (प्रसिध्दीसाठी).
४३. निवडनस्ती.